# भारतीय शहरीकरणाचा एक घटक : स्थलांतर

**डॉ. जयंतकुमार एम. मस्के,** अर्थशास्त्र विभाग प्रमुख, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर
(E-mail : jayantmaskey17@gmail.com, Mob. No. : 9421803327)

**सारांश :**

भारतामध्ये ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे होणारे स्थलांतर हा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील एक महत्वाचा भाग झाला आहे. ग्रामीण ते नागरी, नागरी ते नागरी या स्थलांतरामुळे शहरीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळाली आहे. या स्थलांतराचा संबंध शहरीकरणाशी आहे. हे स्थलांतर वाढले तरच शहरीकरण वाढेल. हे स्थलांतर सतत वाढत आहे. त्यामुळे भारतात शहरीकरणाच्या प्रमाणात वाढ होत आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतीय शहरीकरणाचा एक घटक म्हणून ग्रामीण क्षेत्रातून शहरी क्षेत्रात होणा–या स्थलांतराचा आढावा घेतला आहे.

**बीजशब्द (Keywords)** : स्थलांतर, शहरीकरण, आर्थिक विकास.

**प्रस्तावना :**

शहरीकरणाच्या वाढीला अनेक विविध घटक जबाबदार आहेत. प्राचीन काळात शहरीकरणाची प्रक्रिया ही धार्मिक, सामाजिक, राजकीय इत्यादी घटकांवर अवलंबून होती. परंतु आधुनिक युगात शहरीकरणास आर्थिक, औद्योगिक, व्यापार व इतर अनेक गोष्टी कारणीभूत ठरल्या आहेत.[1] सध्याच्या आधुनिक काळात शहरीकरणावर आर्थिक, सामाजिक व लोकसंख्याशास्त्रीय घटकांचा परिणाम झालेला आढळून येतो.

शहरीकरणावर परिणाम करणा–या घटकामध्ये आर्थिक घटकांचा योगदान सर्वाधिक आहे. आर्थिक घटकांमध्ये औद्योगिकरण, व्यापाराचा विकास, वाहतूक व दळणवळणाच्या साधनाचा विकास, उच्च दर्जाच्या तंत्रज्ञानाचा विकास, शेतामधील यांत्रिकीकरण, इत्यादी प्रमुख घटकांचा समावेश होतो. ग्रामीण भागात रोजगाराची कमतरता, दारिद्रय, बेकारीमुळे शहरी क्षेत्रात स्थलांतर होत आहे. त्यामुळे शहरीकरणावर परिणाम पडत आहे. एखाद्या प्रदेशातील शहरीकरणाच्या वाढीला तेथील विविध सामाजिक घटक जबाबदार असल्याचे आढळून येते. यामध्ये सामाजिक जागृती, स्वतःचे राहणीमान बदलण्याची संधी, शैक्षणिक व आरोग्य विषयक साधनांचा विकास, मनोरंजनाच्या साधनांचा विकास, सरकारी धोरण इत्यादी प्रमुख घटक महत्वाचे मानले जातात.

लोकसंख्याशास्त्रीय घटकामध्ये नागरी व ग्रामीण भागातील भिन्न जन्मप्रमाण, लोकसंख्येचा विस्फोट, ग्रामीण–नागरी स्थलांतर हयांचा समावेश करण्यात येतो. कोणत्याही देशाची सर्वात मोठी शक्ती म्हणजे तेथील जनशक्ती असते. परंतु एका विशिष्ट मर्यादेपलीकडे लोकसंख्या वाढत गेल्यास तो देश कमजोर होऊ लागतो. कारण शेती क्षेत्रावरील वाढता दबाव, अपेक्षित मात्रेत अन्नधाण्याचे उत्पादन न होणे, बिमारी व मुलांची उपेक्षा, वाहतुकीची समस्या, दवाखाण्याची कमतरता, बेरोजगारीत वाढ इ. समस्या जन्माला येतात. म्हणून ग्रामीण समस्यांना त्रासून शहराकडे स्थलांतर होते.[2]

वारेन एस. थामसन यांच्या मते, ''शेती व्यवसायाशी संलग्न खेडयातील लोकसंख्या जेव्हा व्यापार, उद्योग, शासकीय व्यवहार असलेल्या मोठया वसाहतीकडे स्थलांतर करते तेव्हा त्या प्रक्रियेला नागरीकरण असे म्हणतात.

**स्थलांतर म्हणजे काय ? :**

स्थलांतर म्हणजे एका ठिकाणाहून दुस–या ठिकाणी जाणे होय. लोक एका ठिकाणावरून दुस–या ठिकाणी वास्तव्यासाठी जातात तेव्हा त्यास स्थलांतर असे म्हणतात. ग्रामीण भागातील लोक विविध कारणामुळे नगरात जातात आणि तेथे वास्तव्य करतात. त्यातूनच नागरीकरणाची प्रक्रिया सुरू होते. नागरीकरणाच्या प्रक्रियेचा आरंभ नक्की कधी झाला हे खात्रीने वा निश्चितपणे सांगता येत नाही. तरीही नागरी समुदायाचे आजचे उत्क्रांत रूप हे लोकांमधील भौगोलिक गतिशीलतेमुळे म्हणजेच स्थलांतरामुळे निर्माण झाले आहे असे खात्रीने म्हणता येते.[3]

स्थलांतर हा लोकसंख्येच्या बदलाशी निगडित घटक आहे. अलिकडच्या काळात तंत्रज्ञान, जलद गतीच्या वाहनांची उपलब्धता यामुळे मोठया प्रमाणात स्थलांतर होऊ लागले आहे. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेनंतर तर ग्राम–नगर स्थलांतर हा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील महत्वाचा भाग बनला आहे. स्थलांतराची दिशा व गती ही तत्वतः विकासाच्या संधीशी निगडित असते.[4]

आशिष बोस यांनी 1961 च्या जनगणनेच्या आधारे स्थलांतरीत लोकांनी कुठून कुठे स्थलांतर केले या संबंधीचे विवेचन केले आहे. स्थलांतरीत सध्या कुठे राहतात आणि त्याचे जन्मस्थळ कोणते या आधारावर बोस यांनी स्थलांतराचे ग्रामीण–ग्रामीण, ग्रामीण–नागरी, नागरी–नागरी, नागरी–ग्रामीण असे चार प्रवाह सांगितले आहेत.

वर्ष 1991 व 2001 च्या जनगणनेवरून भारतामध्ये दहा वर्षात ग्रामीण क्षेत्रातून ग्रामीण क्षेत्राकडे होणारे स्थलांतर सर्वात जास्त आहे. यामध्ये पुरूषापेक्षा स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. कारण लग्नानंतर स्त्रिया सासरी जातात, त्यामुळे त्यांचे वास्तव्याचे ठिकाण बदलते. मात्र या दहा वर्षात ग्रामीण क्षेत्राकडून ग्रामीण क्षेत्राकडे होणा–या स्थलांतराच्या प्रमाणात घट झाली आहे. वर्ष 1991 मध्ये ग्रामीण क्षेत्राकडून ग्रामीण क्षेत्राकडे होणा–या स्थलांतराचे प्रमाण 69.1 टक्के होते. ते वर्ष 2001 मध्ये 65.3 टक्केपर्यंत कमी झाले आहे. तसेच भारतात एकूण स्थलांतरात नागरी क्षेत्रातून ग्रामीण क्षेत्राकडे होणा–या स्थलांतराचे प्रमाण फारच कमी आहे. म्हणजे 1991 व 2001 या वर्षात एकूण स्थलांतरात नागरी क्षेत्रातून ग्रामीण क्षेत्राकडे होणा–या स्थलांतराचे प्रमाण अनुक्रमे 5.9 व 6.1 टक्के इतके आहे.[5] या दोन्ही प्रकारच्या स्थलांतराचा शहरीकरणाशी संबंध नाही.

ग्रामीण ते नागरी व नागरी ते नागरी या दोन्ही प्रकारच्या स्थलांतरामध्ये स्त्रियांपेक्षा पुरूषाचे प्रमाण जास्त आहे. कारण नौकरी व्यवसायाच्या शोधार्थ युवक मोठया नगराकडे स्थलांतर करतांना दिसतात. कारण शहरांचा सामाजिक, औद्योगिक, व्यवसायिक विकास ग्रामीण भागापेक्षा जास्त झालेला असतो. वर्ष 1991 मध्ये ग्रामीण ते नागरी पुरूष व स्त्री मिळून एकत्रित स्थलांतराचे प्रमाण 14.6 टक्के होते. ते वर्ष 2001 मध्ये 16.7 टक्के इतके झाले आहे. तसेच वर्ष 1991 मध्ये नागरी ते नागरी पुरूष व स्त्री मिळून एकत्रित स्थलांतराचे प्रमाण 10.4 टक्के होते. ते वर्ष 2001 मध्ये 11.9 टक्के इतके झाले आहे. यावरून 1991 च्या तुलनेत 2001 मध्ये दोन्ही प्रकारच्या एकूण स्थलांतरात वाढ झाली आहे.[6] या दोन्ही प्रकारच्या स्थलांतराचा शहरीकरणाशी संबंध आहे.

**भारतातील शहरीकरणाची प्रवृत्ती :**

स्वातंत्र्योत्तर काळात देशाचा जस–जसा आर्थिक विकास होत गेला तस–तसा शहरीकरणाच्या प्रमाणात वाढ होत गेली. गेल्या काही वर्षापासून भारतातील ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण कमी कमी होत असून शहरी लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे. याचे कारण शहरे ही उद्योगधंदे, व्यापार व दळणवळणाची केंद्रे असतात. त्यामुळे ग्रामीण भागातील लोक रोजगार मिळविण्यासाठी शहरांकडे धाव घेतात. शिवाय शहरे ही आरोग्य, शिक्षण व मनोरंजनाची केंद्रे असल्याने ग्रामीण भागातील लोकांना याही दृष्टीने शहराचे आकर्षण असते. त्यामुळे ग्रामीण भागातील लोक शहराकडे स्थलांतर करतात. या कारणाने भारतात शहरीकरण वेगाने होत आहे. भारतात शहरीकरण कसे होत आहे हे पुढील आकडेवारीवरून स्पष्ट होते.

भारतातील शहरीकरणाची प्रवृत्ती तक्त्यामध्ये दर्शविलेली आहे. यावरून असे दिसून येते की, 1951 ला शहरीकरणाचे प्रमाण 17.29 टक्के होते. त्यानंतर प्रत्येक दशकात शहरीकरणाच्या प्रमाणात वाढ होत गेल्याचे दिसून येते. 2001 व 2011 च्या जनगणनेनुसार भारतात शहरीकरणाचे प्रमाण अनुक्रमे 27.78 व 31.16 टक्के आहे.

1961–71 व 1971–81 या दोन दशकात शहरीकरणाचा दशकवृद्धी दर वाढला आहे. कारण ग्रामीण भागात फार मोठया प्रमाणात बेकारी व दारिद्रय वाढत होते. यामुळे ग्रामीण भागातून शहरी भागात रोजगारासाठी जास्त लोक स्थलांतरीत झालेले आहेत व नैसर्गिक लोकसंख्या वाढीचा वृद्धीदर या दोन दशकात जास्त होता. 1981–91, 1991–01, 2001–11 या दशकात पुन्हा शहरीकरणाचा दशक वृद्धीदर घटला आहे. कारण या दशकात ग्रामीण भागाच्या विकासाकडे बरेच लक्ष देण्यात आले होते. रोजगार निर्माण करणारी साधने ग्रामीण भागात निर्माण करण्यात आली व विविध कार्यक्रम आखले त्यामुळे ग्रामीण क्षेत्रातून होणा–या स्थलांतरात घट झाली. तसेच लोकसंख्या नियंत्रणाचे अनेक प्रोत्साहनपर कार्यक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे शहरातील नैसर्गिक लोकसंख्या दर घटून शहरी लोकसंख्या वाढीतील दशक वृद्धीदर घटला आहे.

**भारतातील शहरीकरणाची प्रवृत्ती (1901—2011)**

| वर्ष | लोकसंख्या (दशलक्षमध्ये) | | शहरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण (टक्के) | शहरांची संख्या | शहरी लोकसंख्येचा दशक वृद्धी दर |
|---|---|---|---|---|---|
| | एकूण | शहरी | | | |
| 1951 | 361.10 | 62.44 | 17.29 | 3035 | 41.42 |
| 1961 | 439.09 | 78.94 | 17.97 | 2657 | 26.41 |
| 1971 | 548.23 | 109.11 | 19.91 | 3081 | 28.23 |
| 1981 | 683.33 | 159.46 | 23.34 | 3981 | 46.14 |
| 1991 | 846.39 | 217.55 | 25.70 | 4615 | 37.52 |
| 2001 | 1028.61 | 285.36 | 27.78 | 5161 | 31.39 |
| 2011 | 1210.19 | 377.10 | 31.16 | 7935 | 31.80 |

Sources : Census of India 1991, Census of India 2001, Census of India 2011 (www.censusindia.gov.in) Provisional Population Totals, Paper 2, Volume 1, Rural – Urban Distribution, India Series 1.

भारतातील 70 टक्के जमीन निसर्गाच्या लहरीवर आधारित आहे. त्यामुळे भारतीय शेती मागासलेली आहे. भारतीय लोकसंख्येत प्रचंड गतीने वाढ होत आहे. त्यामुळे कृषिजन्य भूमिवर लोकांचा दाब वाढत आहे. लोकसंख्येच्या मानाने नैसर्गिक साधन संपत्तीत वाढ होत नाही. त्यामुळे सर्वाचे भरण—पोषण केवळ शेतीवर होणे कठिण जावू लागले आहे. शेतीवरील वाढत्या भारामुळे शहरीकरण प्रक्रिया गतिमान होते. ग्रामीण परिसरात आजही शिक्षणाच्या सुविधांचा अभाव आहे. आज ग्रामीण विभागात प्राथमिक, माध्यमिक तर काही मोठया गावात उच्च माध्यमिक शिक्षणाच्या सोयी जरी उपलब्ध असल्या तरी उच्च शिक्षणाकरिता ग्रामीण परिसरातील मुलांना शहराचा आश्रय घ्यावा लागतो. शहरामध्ये नवीन उद्योगांची स्थापना व जुन्या उद्योगाचा विस्तार झाल्यामुळे श्रमशक्ती शहरात खपू लागली. शहरामध्ये नवीन—नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ लागल्यामुळे लोक शहराकडे आकर्षित होऊ लागली तसेच ग्रामीण क्षेत्रात शेतीला पर्यायी रोजगार व्यवस्था उपलब्ध होऊ न शकल्यामुळे आणि लघु व कुटीर उद्योगांचा —हास झाल्यामुळे लोक ग्रामीण क्षेत्रातून शहरी क्षेत्राकडे स्थलांतरीत होऊ लागली. याशिवाय ग्रामीण भागात दारिद्रय, बेकारी, आर्थिक विषमता सतत वाढत आहे. म्हणून ग्रामीण भागातून रोजगारासाठी लोक शहरी भागात येत आहेत. शहरामध्ये उपलब्ध शिक्षण, आरोग्य व इतर आधुनिक जीवनातील सुविधा ग्रामीण परिसरातील लोकांना शहराकडे आकर्षित करते. गावात पैसा जवळ असूनही सुखोपयोगी साधने उपलब्ध नसतात. शहरात मनोरंजनाची अनेक साधने उपलब्ध असल्यामुळे तिथे जीवनाचा आनंद घेतल्या जाऊ शकते. ग्रामीण परिसराच्या तुलनेत शहरामध्ये राहणीमानाचा दर्जा उच्च पातळीचा असतो. ही गोष्ट लक्षात घेऊन प्रगती करण्याच्या अभिलाषेने लोक शहराकडे आकर्षित होतात.

एखाद्या प्रदेशाच्या लोकसंख्येत होणा—या वाढ व घटवरून स्थलांतर मोजता येते. जसे देशातील जन्मदर आणि मृत्युदर यातील फरक म्हणजे लोकसंख्येची नैसर्गिक वाढ—घट होय. तसेच लोकसंख्येची नैसर्गिक वाढ—घट व प्रत्यक्ष वाढ—घट यातील फरक म्हणजे स्थलांतराचा दर होय. यावरून लोकसंख्येची प्रत्यक्षातील वाढ नैसर्गिक वाढीपेक्षा जास्त असते. तेव्हा लोकसंख्येचे बाहेरून स्थलांतरण होते. 2001 ते 2011 या दहा वर्षामध्ये महाराष्ट्राच्या लोकसंख्येतील प्रत्यक्ष वाढ 16.00 टक्के तर नैसर्गिक वाढ 10.00 टक्के होती. म्हणजेच राज्यामध्ये 10 वर्षामध्ये 5.6 टक्के इतके स्थलांतरण झाले आहे.[7] याचा अर्थ असा होतो की, स्थलांतरण करणा—या लोकांच्या प्रदेशांपेक्षा महाराष्ट्रामध्ये आर्थिक संधी जास्त आहेत. याचा अर्थ महाराष्ट्रात बेरोजगारी नाही असा होत नाही. सन 2009—2010 मध्ये महाराष्ट्रातील शहरी बेरोजगारीचा दर 3.2 टक्के आहे.[8] महाराष्ट्रातील बेरोजगारी त्यांच्या राज्यातील बेरोजगारीपेक्षा कमी आहे असे म्हणता येईल.

**निष्कर्ष :**

शहरीकरणाच्या कारणामध्ये उद्योगाचा विकास हे कारण महत्वपूर्ण समजल्या जाते. परंतू भारतात उद्योगाशिवाय इतर कारणामुळेही शहरीकरण घडून आल्याचे दिसून येते. वास्तविकताः भारतामध्ये ग्रामीण क्षेत्रात भूमिहीन शेतक–यांची अधिक संख्या, रोजगाराची अनुपलब्धता, असुरक्षा, गरीबी इत्यादी कारणामुळे ग्रामीण लोकसंख्या शहराकडे स्थलांतरीत झाली आहे. आर्थिक कारणासाठी होणा–या स्थलांतरामुळे शहरीकरण वाढत आहे. आर्थिक विकास व स्थलांतराचे प्रश्न एकमेकांशी थेट संबंधीत असल्यामुळे स्थलांतरासंबंधी शासनाने विकासाभिमुख धोरण आखणे आवश्यक आहे. शहरातील वाढत्या लोकसंख्येचा दाब रोखण्यासाठी गांधीजींच्या संकल्पनेनुसार ग्रामीण क्षेत्राचा विकास करून त्यांना आत्मनिर्भर बनविणे आवश्यक आहे. तसेच ग्रामीण क्षेत्रातील उद्योग व कृषी यांचा विकास केल्यास ग्रामीण लोकसंख्येचे शहराकडे होणारे स्थलांतर रोखता येणार आहे.

**संदर्भ :**


1) खतीब के. ए. (1998) : ''नागरी भूगोल'', मेहता पब्लिशिंग हाऊस, सदाशिव पेठ, पुणे. P - 34.
2) तिवारी विजयकुमार (1998) : ''जनसंख्या भूगोल'', हिमालया पब्लिशिंग हाऊस, गिरगॉव, मुंबई. P - 304.
3) लोटे रा. ज. (2002) : ''ग्रामीण व नागरी समाजशास्त्र'', पिंपळापुरे कं. पब्लिशर्स, हिंदू मुलींचे शाळेजवळ, महाल, नागपूर. P - 100.
4) खैरनार दिलीप (2004) : ''लोकसंख्या आणि समाज'', चिन्मय प्रकाशन, पैठण गेट रोड, औरंगाबाद. P - 56.
5) Register General of India Decennial Report – 2001.
6) Ibid.
7) आर्थिक सर्वेक्षण वर्ष 2013–2014.
8) आर्थिक सर्वेक्षण वर्ष 2009–2010.